**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, SEPT-OCT, 2019, VOL- 7/53*

# भविष्याभ्यास आणि शिक्षण

**प्रताप भाऊसाहेब आत्रे**

*सहाय्यक प्राध्यापक , शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक**:-मानवाच्या जीवनात अनेक परिवर्तने होत असतात .आज जी परिस्थिती आहे ती उद्या असणार नाही .उद्या जी परिस्थिती असेल ती एका वर्षाने राहणार नाही हा परिवर्तनाचा वेग झपाट्याने वाढत आहे. आणि मनुष्याला तर या परिवर्तनाशी समायोजन साधने अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा या परिवर्तनामध्ये काय बदल होऊ शकेल ? त्या बदलाचे परिणाम काय होतील ? मनुष्याला त्या परिस्थितीत कसे वागावे लागेल. याचा विचार मनुष्याने वर्तमान परिस्थितीत करणे गरजेचे ठरते.तरच मानवाला जीवन जगतांना नैराश्य, तणाव, संघर्ष, वैफल्य यासारख्या बाबींना सामोरे जावे लागणार नाही .मानवाला आता भूतकाळात व वर्तमानाकाळात रमून चालणार नाही .तर त्यास सातत्याने भविष्यकाळाचा वेध घेत राहणे आवश्यक आहे.भविष्यकाळाचा वेध घेणाऱ्या ज्ञानशाखेस 'भविष्याभ्यास ' म्हणतात . इ.स. १९०२ साली 'वेल्स' यांनी भविष्यातील घटनांचा वेध घेऊन पूर्वानुमान करणाऱ्या ज्ञानशाखेस 'भविष्याभास'(science of the Future) असे नाव दिले .त्यानंतर इ. स. १९०७ मध्ये 'गिलाफिलन'या शास्त्रज्ञाने 'भविष्य कालीन घटनांचे शास्त्र (Melantology) असे नाव दिले.पुढे १९४३ साली 'ओसिप फ्लेशथायम' यांनी 'भविष्यशास्त्र'(Futurology) ही संकल्पना मांडली . परंतु ही ज्ञान शाखा विज्ञानाच्या,शास्त्राच्या कसोटीला पूर्णपणे उतरलेली नसल्यामुळे त्या संज्ञाला भविष्यशास्त्र म्हणण्याऐवजी भविष्याभ्यास म्हंटले जाऊ लागले.

**.भविष्याभ्यास संकल्पना**

वर्तमान स्थिती व भूतकालीन स्थिती यांचा विचार करून भविष्यकालीन घटनांचा तर्कशुध्द अंदाज करणाऱ्या ज्ञानशाखेस भविष्याभ्यास असे म्हटले जाते. भविष्यकाळात मानवी जीवनात कोणकोणते बदल घडून येणे शक्य आहे याचे पूर्वानुमान करणारी **शाखा म्हणजे भविष्याभ्यास.**

भविष्याभ्यास म्हणजे ज्योतिष्यशास्त्र किंवा भविष्यकथन नव्हे.ज्योतिष्यशास्त्राला किंवा भविष्यकथनाला विज्ञानाचा वा कुठलाही तार्किक आधार नसतो.पण भविष्याभ्यासात मात्र वैज्ञानिक आधारावर व मनुष्य वर्तमानकाळात कोणत्या कृती करतो व त्याचा परिणाम काय होऊ शकतो याचा विचार केला जातो . भविष्याभ्यासात भविष्यकाळात काय घडणे शक्य आहे याचा बुध्दिसंगत व वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. अमेरिकेतील World Future Society ने भविष्याभ्यासाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे ' मानवीजीवन व जगातील आगामी संभाव्य परिवर्तनाची नोंद घेणारे,त्यांचे विश्लेषण व मूल्यांकन करणारे अभ्यासक्षेत्र म्हणजे भविष्याभ्यास होय .

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**भविष्याभ्यास व भविष्यकथन फरक**

| भविष्याभ्यास | भविष्यकथन |
|---|---|
| १ वैज्ञानिक व तार्किक आधार असतो | १ कुठल्याही प्रकारचा वैज्ञानिक व तार्किक आधार नसतो |
| २ भविष्याभ्यासाला नियतीवाद अमान्य | २ भविष्य कथन पूर्णतः नियतीवादावर अवलंबून . |
| ३ भविष्याभ्यास मनुष्य वर्तमान काळात जे निर्णय घेणार व ज्या कृती करणार यावर आधारित | ३ भविष्य कथन पूर्वनिर्धारित कर्म,इच्छा,ईश्वरी भावना यावर आधारीत |
| ४ भविष्य काळात काय घडणे शक्य आहे यांचा बुध्दीसंगत व वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास या मध्ये केला जातो | ४फलज्योतिष्य,हस्तसामुद्रिक,शकूनशास्र इत्यादी पद्धतीने अभ्यास केला जातो |
| ५ भविष्याभ्यास संस्कृती च्या भवितव्याशी ,सार्वजनिक घटनांशी संबधित असतो . | ५ भविष्यकथन हे विशिष्ट व्यक्तीच्या भावी जीवनातील घटनांशी संबधित असते. |
| ६ येत्या पुढील वर्षांमध्ये कोणकोणते बदल होतील या प्रश्नांचे उत्तर भविष्याभ्यासात दिले जाते | ६यावर्षी वर्षी काय होईल या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न भविष्य कथनात केले जाते. |

**भविष्याभ्यासाची उद्दिष्टे**

**१भविष्यकालीन परिणामां विषयी सजग दृष्टीकोन विकसित करणे :-**समाज हा परिवर्तन शील असल्यामुळे समाजामध्ये उत्तरोत्तर परिवर्तन ही होताच राहणार आहे ही परिवर्तने कोणत्या आधारावर झाली याचा आढावा घेऊन या परिवर्तनामुळे पुढे काय परिणाम होतील याची पूर्वकल्पना भविष्यभ्यासातून करून घेता येते आणि त्या परिणामांना अनुसरून जीवन जगण्याची पूर्व तयारी मानवाला करता येते.अनेक वेळा समाजात होणारी परिवर्तने सकारात्मक असतात तर काही नकारात्मक असतात .त्यामुळे परिणामानुसार समायोजन करण्यासाठी जागृत दृष्टीकोन विकसित करणे महत्वाचे ठरते

**२अध्ययन कसे करावे यावर भर देणे**:-भविष्यामध्ये अध्यापनासाठी अनेक साधने उपलब्ध असणार यात शंका नाही.आज जी अध्यापनाची माध्यमे,पद्धती,तंत्रे,सूत्रे आहे या मध्ये आमुलाग्र स्वरूपाचे बदल होतील त्यामुळे भविष्य कालीन शिक्षणात अध्यापनावर भर न राहता विद्यार्थ्यांनी अध्ययन कसे करावे यावरच भर राहणार आहे विद्यार्थ्यांना अध्ययन कसे करावे हे तंत्र जर माहित करून दिले तर ते अध्यापनाच्या साधनांमध्ये,घटनांमध्ये उत्तरोत्तर बदल होतील त्या बदलामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन गतीत फरक पडेल व त्यांना काळानुसार ज्ञान ग्रहण कसे करावे याची माहिती होईल.

**३ सामाजिक संबंध वाढविणे व त्यांची जोपासना करणे :-**२१ शतकात तंत्रज्ञानाच्या युगात भौतिक घटकांशी मानवाचे संबंध दृढ झाले व मानवा-मानवातील आंतरक्रिया कमी होऊन माव हा मानवापासून दूर जाऊ लागला आहे.मानवातील आत्मीयता,जिव्हाळा,प्रेम कमी-कमी होत चाललेले आहे. याचा परिणाम म्हणून माणसाच्या मनात एकाकी भाव व परात्मभाव वाढत जाऊन एक प्रकारची मानसिक पोकळी भविष्यकाळात निर्माण झालेली असेल.या साठी व्यक्तीमधील आंतरक्रिया वठविणे,मानवी संबंध प्रस्थापित करण्याचे व टिकविण्याचे विविध मार्ग उपलब्ध करून देण्याचे कार्य शिक्षणास करावे लागणार आहे .

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**४सामाजिक व नैतिक मुल्यांचा विकास करणे:-**उद्याच्या संगणक युगात सामाजिक जीवन हे वैविध्याने भरलेले असेल.जीवन जगण्याचे अनेक मार्ग,पर्याय उपलब्ध असतील अनेक पर्यायमधून कोणत्याही पर्यायाची,मार्गाची निवड करण्याचे स्वातंत्र्य असेल .त्यामुळे जीवन जगण्यासाठी कोणत्या मुल्यांचा स्वीकार करावा,कोणत्या मुल्यांचा त्याग करावा,कोणती जीवन पद्धती स्वीकारावी याचा शिक्षण प्रक्रियाला सारासार विचार करावा लागणार आहे.भविष्य कालीन मुल्य कसे निवडावे,त्या मुल्यांचा अर्थ नेमका कसा लावावा,त्यांची व्यवहारातील उपयुक्तता कशी तपासावी या संबधीचे शिक्षण द्यावे लागेल.

- **भविष्याभ्यासाच्या पद्धती**

**१ बुध्दिमंथन:-**ही भविष्याभ्यासाची एक महत्वाची पद्धत मानली जाते ऑसबोर्न हा या पद्धतीचा जनक होय .व्यक्तीला सुचणाऱ्या नवनवीन व लोकविलक्षण कल्पनाच्या अभिव्यक्तीत येणारे अडथळे दूर करून व्यक्तीला कल्पनाभिव्यक्तीत मुक्त वाव देणारे हे तंत्र आहे.

**२ सिनेरिओ रायटिंग :-**कान्ह व वायनर यांनी ही भविष्याभ्यासाची पद्धत सुचविली आहे कल्पनाविलास हा या पद्धतीचा आधार आहे कल्पनाशक्ती व सृजनशीलतेच्या आधारे भविष्यकालीन विविध संभाव्य घटनाक्रमांची व त्यामधील आंतरक्रियाचा लिखित स्वरुपात आखणी म्हणजे सिनेरिओ रायटिंग होय व्यक्ती कोणत्या कृती बाबत निर्णय घेण्यापूर्वी ती कृती प्रत्यक्षात येण्यासाठी आवश्यक असलेली पूर्वतयारी व त्या कृतीचे संभाव्य परिणाम यांचा जो सारासार विचार हा एक सिनेरिओ रायटिंगचाच भाग असतो.

**३ डेल्फाय तंत्र :-**भविष्याभ्यासाचा विचार करण्यासाठी डॉ.गेल्फ हेल्मर यांनी हे तंत्र सुचविले .हेल्फाय हे ग्रीसचे पवित्र नगर होते हे दैववाणीसाठी प्रसिद्ध होते या वरून अनेक विशेष जाणकारांच्या अंदाजाने त्यांच्या अभ्यास क्षेत्राशी संबंधित समस्यांवर त्यांचे तज्ज्ञ मत मिळविण्याचे तंत्र म्हणजे डेल्फाय तंत्र होय.

**४ प्रक्षेपण :-** भविष्यकाळ हा भूतकाळासारखाच असेल किंवा भूतकाळात ज्या गतीने व दिशेने परिवर्तन होत होती त्याच गतीने व दिशेने ती भविष्यात ही होत राहणार हे गृहीत धरून एखाद्या घटनेबाबत विशिष्ट कालावधीत होणाऱ्या परिवर्तनाची गती व दिशा यांची नोंद घेऊन त्यांचे भविष्यात सादरीकरण करणे म्हणजे प्रक्षेपण होय .

**५ सुसंगती वृक्ष :-** भविष्य काय असेल यापेक्षा भविष्य काय असू शकेल या बाबींचे सुस्पष्ट चित्रण सुसंगती वृक्षाने होत असते .आदर्शक पुर्नानुमानाच्या पद्धती पैकी ती एक पद्धती होय .यामध्ये सर्व प्रथम भविष्यकालीन ध्येय निश्चित केली जात्तात त्या ध्येयांची पूर्ती वर्तमान किंवा मध्यम भविष्यात होण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांची नोंद घेतली जाते .

**६ परस्पर संघात विश्लेषण :-**हेल्मर आणि गॉर्डन यांनी १९६६ साली ही पद्धती विकसित केली .जीवनात घडणाऱ्या घटना ह्या एकमेकांवर अवलबून असतात .त्याच प्रमाणे त्या एकमेकांना प्रभावित करत असतात व संभाव्य घटनांवर व त्याच्या निर्धारणावर परिणाम करीत असतात .या पद्धती मध्ये भावी घटना मधील पास्परिक क्रियांच्या परिणामांचे वर्णन केले जाते .

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

७ **सेठ- हार्वा पद्धती :-** प्रतिमा चित्र तयार करण्यासाठी डॉ. सेठ यांनी हार्वा पद्धतीच्या आधारे 'सेठ-हार्वा' या नावाने एक नवीन परिष्कृत पद्धती विकसित केली आहे .ज्या विषयाबाबत प्रतिमा –चित्र तयार करावयाचे असेल त्या संबंधिची आवश्यक ती सर्व प्रकारची माहिती त्यांना तज्ज्ञांच्या विशेष व्याख्यानाद्वारा दिली जाते .यामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींचे दोन गट केले जातात .विविध पायऱ्या मधून प्रतिमा चित्र तयार होते.

समारोप:- भविष्यात शिक्षणातील पारंपारिक अध्ययन-अध्यापन पद्धती नामशेष झालेल्या असतील त्या ठिकाणी आधुनिक अध्यापन पद्धती येतील.भविष्यात विद्यार्थांचे कौशल्य विकसित करणे,भविष्याबाबत संशोधन करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांचा विकास करणे ही आव्हाने भविष्याभ्यासा समोर शिक्षणाने ठेवलेली आहे .

**संदर्भ:**

*ह.ना.जगताप 'शिक्षणातील नव प्रवर्तने'नूतन प्रकाशन पुणे*

*शिरोडे संगिता 'वर्तमान शिक्षणातील विचार प्रवाह'नूतन प्रकाश .*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*